# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**(नॅक समिती तर्फे अ दर्जा प्राप्त)**


दुरध्वनी- (०२४०)२४०३३९९,२४०३४००
कुलसचिव- (का.) २४०३३३ (नि.)
फॅक्स- २४००२०३
तार- (०२४०) २४०३११३,२४०३३५
बेब-साईट-बामुसिटी
www.bamu.net

विद्यापीठपरिसर,
**औरंगाबाद-४३१००४**
(महाराष्ट्र) भारत.


संदर्भ क्र./शैक्ष/ 25300-729

दि.०६/०३/२०१८

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

विषयः- संलग्नीत अनुदानित महाविद्यालयातील सहा./सहयोगी प्राध्यापकांच्या कॅस स्थाननिश्चिती मान्यते बाबत..

संदर्भः- सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र.शिससं/उशि/औवि/अनुदान/२०१८/७६० दिनांक २८/०२/२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने दिनांक ०५/०२/२०१८ ते दि. ०८/०२/२०१८ या कालावधीत स्थाननिश्चिती शिबीर जिल्हानिहाय आयोजित केले होते. त्या अनुषंगाने या कार्यालयास बरेचशे स्थाननिश्चितीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. आता संदर्भीय पत्राद्वारे सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांनी खालील मुद्दयांची सखोल तपासणी करुन प्रस्तावांना मान्यता देण्यात यावी असे कळविले आहे.

१) संबंधीत अध्यापकाचे जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
२) लहान कुटूंब कायदा २००५ नुसार अपत्य प्रमाणपत्र प्रस्तावासोबत घेण्यात यावे.
३) अल्पसंख्याक दर्जा प्राप्त महाविद्यालयातील प्राध्यापक नियुक्त्या व अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त प्रमाणपत्राबाबत खातरजमा करण्यात यावी व प्रकरणे तपासण्यात यावीत.
४) नियुक्ती बाबत जाहिरात नियमानुसार आहे किंवा नाही तसेच भरतीप्रक्रियेबाबतचे सर्व कागदपत्रांची तपासणी प्रथम स्थाननिश्चिती प्रकरणामध्ये करण्यात यावी.

उपरोक्त मुद्दयांनुसार आपल्या महाविद्यालयाकडून कार्यवाही करुन परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत. तसेच ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले आहे त्यांनी उपरोक्त मुद्दयांनुसार कागदपत्राची पूर्तता या कार्यालयास करुन प्रस्ताव परिपूर्ण आहे याची खात्री करुन घ्यावी. जेणे करुन प्रस्तावांना मान्यता देणे विषयीचे काम लवकर होईल. या काही त्रुटी राहिल्यास त्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांवर राहील, याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**

सोबत - संदर्भीय पत्र